# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड     **P.S.(ठाणे):** भोकर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0025     **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/01/2023 00:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | ~~भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८~~ | ~~7~~ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 11/01/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/01/2023
   **Time From (वेळेपासून):** 12:06 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/01/2023     **Time (वेळ):** 23:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 042
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2023 23:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी     **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यलय भोकर ,भोकर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मो.सलीम म.अलीमोधीन

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सईद नगर भोकर , भोकर ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सईद नगर भोकर , भोकर ,भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष रघुनाथ कोंडलवार | | | 1. वायफना , हंदगाव ,भोकर, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | दिपक चंद्रकांत घोगरे | | | 1. सईद नगर भोकर ,भोकर , भोकर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

पोलीस स्टेशन भोकर,
दिनांक 17/01/2023

मो.सलीम अलीमोधीन वय 38 वर्ष, व्यवसाय - वकील, रा..भोकर ता. भोकर जि. नांदेड. मोबईल क्रमांक 9970616667.

मी समक्ष पोलीस स्टेशन भोकर येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 06/01/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, सरस्वती भ्र. नारायण देशमुख रा. करखेली व अंजनाबाई मारोतराव जोडतळे रा. गारगव्हाण यांच्या नावे सावरगांव मेट येथे असलेली गट क्र .87 मधील 01 एकर 20 गुंठे गायरान शेत जमीन ही विकत घेण्याचा करार केला आहे. सदरील गायरान शेत जमीनीचे खरेदीखत करण्यासाठी शासनाची परवानगी काढण्यासाठी आम्हाला गायरान पट्टा मंजूरीचे आदेशाची नक्कल देणेसाठी तहसिल कार्यालय भोकर येथील कर्मचारी श्री कोंडलवार व श्री दिपक हे 15000/- रू ची लाचेची मागणी करीत आहे वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे नमुद तक्रारीच्या अनुशंगाने दिनांक 09/01/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात गेलेला असता सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री कदम यांनी सापळा कार्यवाहीकामी उपस्थित पंच क्र 1) श्री. सुरेंद्र दत्तात्रय हुगे, वय 48 वर्ष, व्यवसाय नोकरी पद वाहक/7660 नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहण महामंडळ नांदेड आगार, नांदेड, 2) अब्दुल रफिक म. सुलतान, वय 44 वर्ष, व्यवसाय नोकरी पद वाहक/10670 नेमणुक महाराष्ट्र राज्य परिवहण महामंडळ नांदेड आगार, नांदेड यांची व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली त्यानंतर दोन्ही पंचानी माझे तक्रारीबाबत खात्री केली

त्यानंतर सर्व सापळा पथक त्यांचे शासकीय वाहनाने भोकर शहराकडे निघाले मी माझे मोटारसायकलने भोकर जवळील रिठ्ठा रोडवरील महादेव मंदीराचे परिसरात येवून सापळा पथकास भेटलो त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री कदम यांनी माझे तक्रारीच्या अनुशंगाने लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेवून मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिती दिली. त्यावेळी पोलीस कर्मचारी ईश्वर जाधव यांनी पोनि श्री कदम साहेब, माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले व त्यानंतर पोनि श्री कदम यांनी मला लाचमागणी पडताळणीबाबत योग्य त्या सुचना देवून माझेकडे डिजिटल व्हाईस रेकॉर्डर देवून पंच क्र-1 श्री हुगे यांचेसह मला तहसिल कार्यालय भोकर येथे कर्मचारी श्री कोंडलवार यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. मी व पंच क्र-1 श्री हुगे असे तहसिल कार्यालयात गेलोत असता कर्मचारी कोंडलवार हे कार्यालयात उपस्थित नव्हते. मी तेथे इतर कर्मचारी यांचेकडे चैकशी केली असता मला समजले की श्री कोंडलवार हे महसुल क्रिडा चालु असल्याने औरंगाबाद येथे गेले व ते उदया किंवा परवा कार्यालयात येणार आहेत. आम्ही तेथुन परत सापळा पथकाजवळ येवून पोनि श्री कदम यांना सर्व हकीकत सांगितली. तेव्हा पोनि श्री कदम यांनी दोन्ही पंचाशी व माझेशी चर्चा करून श्री कोंडलवार हे त्यांचे कार्यालयात आल्या नंतर लाच मागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला व मला घरी जाण्याची परवानगी दिली.

त्यानंतर दिनांक 10/01/2023 रोजी दुपारी मला श्री कोंडलवार हे कार्यालयात आल्याचे समजले मी पोनि श्री कदम यांना फोनव्दारे कळविले तेव्हा पोनि श्री कदम, दोन पंच व सर्व सापळा पथक असे भोकर शहराचे जवळ असलेल्या गुड्डा महादेव मंदीराजवळ सुरक्षित ठिकाणी आले मी त्यांची भेट घेतली त्यावेळी पोनि श्री कदम यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेवून योग्य त्या सुचना दिल्या व माझेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर देवून पंच क्र-1 श्री हुगे यांचेसह मला तहसिल कार्यालय भोकर येथे श्री कोंडलवार व श्री दिपक यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. मी व पंच क्र-1 हुगे असे तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षात गेलो तेथे श्री कोंडलवार यांची भेट घेवून त्यांना गायरान पटट्याच्या आदेशाची नक्कल बाबत बोललो असता श्री कोंडलवार यांनी तुमचे काम झाले असुन तुमच्या नक्कलेची प्रत त्याला तुम्हाला देण्यास पुर्वीच सांगितले आहे. तो सध्या कार्यालयात हजर नाही तो

आल्यानंतर तुम्हाला फोन करतो त्यानंतर तुम्ही या असे म्हणाले त्यावेळी मी व पंच क्र-1 श्री हुगे असे तेथुन परत सापळा पथकाजवळ येवून सर्व हकीकत पोनि श्री कदम यांना सांगितली तेव्हा पोनि श्री कदम यांनी पंचाषी व माझेशी चर्चा करून कर्मचारी कोंडलवार यांचा फोन आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत कर्मचारी कोंडलवार यांचा फोन न आल्याने पोनि श्री कदम यांनी माझेशी व पंचाशी चर्चा करून पुढील कार्यवाही दिनांक 11/01/2023 रोजी करण्याचा निर्णय घेतला व मला घरी जाण्याची परवानगी दिली.

दिनांक 11/01/2023 रोजी पोनि श्री कदम साहेब व सर्व सापळा पथक असे 10.50 वाजता भोकर शहराचे जवळील गुड्डा महादेव मंदीराजवळ आले मी त्यांची भेट घेतली तेव्हा पोनि कदम यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी माझे विनंतीवरून पोनि श्री कदम यांनी पंच क्र-1 श्री हुगे यांना पंच क्र-2 म्हणुन व पंच क्र-2 श्री अब्दुल रफिक म. सुलतान यांना पंच क्र-1 म्हणुन नियुक्त केले. पोनि श्री कदम यांनी मला योग्य त्या सुचना दिल्या व माझेकडे डिजिटल व्हाईस रेकॉर्डवर दिल्यानंतर मी व पंच क्र-1 अब्दुल रफिक असे तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये गेलो. सदर ठिकाणी कर्मचारी कोंडलवार यांची भेट त्यांना नमस्कार करून कामासंबधाने नक्कल प्रतीची मागणी केली. त्यावेळी श्री कोंडलवार यांनी हो गया तुम्हारा असे सांगुन गायराण पटटा मंजुर आदेशाची प्रत मला दाखविली व है क्या देखे अपनीच असे म्हणाले त्यावेळी मी ती नक्कल पाहुन बरोबर यही है असे म्हणालो तेव्हा श्री कोंडलवार यांनी मला अर्ज केला आहे काय? असे विचारणा केली तेव्हा मी त्यांना दोन-तीन वेळा अर्ज केल्याचे सांगितले. त्यावेळी माझा अर्ज मिळुन येत नसल्याने श्री कोंडलवार यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेला श्री दिपक यांना माझा नव्याने पुन्हा एक अर्ज लिहुन घेण्यास सांगितले तेव्हा श्री दिपक यांनी त्यांचे हस्ताक्षरात विहित नमुन्यातील अर्ज भरला. त्यावर मी स्वाक्षरी केली. त्यावेळी कर्मचारी श्री कोंडलवार यांनी श्री दिपक यांना माझे अर्जावर गोडबोले साहेब यांचा शेरा घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर कर्मचारी श्री कोंडलवार यांनी गायराण पट्टा मंजुरी आदेषाची नक्कल मला दिली त्यावेळी मी श्री कोंडलवार यांना धन्यवाद साहेब असे म्हणालो तेव्हा श्री कोंडलवार हे माझेकडे पाहुन मला फिस का क्या हो गया ? अशी विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना फिस का? अशी विचारणा करून क्या देणे का? बोलो असे विचारले. त्यावेळी कर्मचारी श्री कोंडलवार यांनी तुम्हारी उसके साथ बात हुई, क्या बात हुई तूमकोच मालुम, जो भी बात हुई तुम दोनो को मालुम असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पधरा हजार बोल रहा था असे सांगीतले. त्यावर कर्मचारी श्री कोंडलवार यांनी मला तुमको मालुम है, क्या बोला वह, तुम क्या देणे वाले है, क्या करणे वाले है असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना बारा हजार देतो असे म्हणालो असता श्री कोंडलवार हे दिपक आल्यानंतर त्याचे समोरच बोलतो असे म्हणाले व श्री दिपक त्या ठिकाणी येताच श्री कोंडलवार यांनी दिपकला विचारणा केली की, काय हे पंधरा हजार मागले असे म्हणुन, ऐकुन घ्या ना बारा देतो म्हणाले. त्यावर दिपक याने कस काय बघा आता काय ते असे म्हणाले. त्यावेळी मी दिपक यास बारा हजार देतो असे म्हणाले असता त्यावर दिपक याने तुम्ही म्हणल तस असे म्हणुन होकार दिला मी दिपक यास सर हो बाई आयी की तुम्हको ला के देता असे म्हणालो असता दिपक यांनी कोई बात नही असे म्हणुन लाच घेण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर मी अर्धा-एक तासांनी घेवुन येतो असे श्री कोंडलवार व श्री दिपक यास सांगुन मी व पंच क्र-1 श्री अब्दुल रफिक असे तेथुन बाहेर निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी येवून पोनि श्री कदम यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यावेळी पोनि श्री कदम यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले.

एकंदरीत दिनांक 11/01/2023 रोजीच्या लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये कर्मचारी श्री कोंडलवार व दिपक यांनी मला गायराण पट्टा जमिनीच्या आदेशाची नक्कल दिली व फिसच्या नावाखाली बक्षिस म्हणुन तडजोडीअंती 12000/- रू लाचेची मागणी कल्याचे निष्पन्न झाले. त्यावेळी पोनि श्री कदम यांनी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी मी सापळयाकामी लागणारी 12000/- रू रक्कम पंच क्रमांक-2 यांचेकडे दिली. त्यानंतर पोनि श्री कदम यांचे सुचनेवरून पोहेकॉ गणेश तालकोकुलवार यांनी मला व दोन्ही पंचास अँल्ट्राव्हायलेट लॅम्प व अँन्थ्रोसिन पावडर बद्दल थोडक्यात माहिती देवून प्रात्यक्षिक दाखविले. त्यावेळी पोनि श्री कदम यांनी सापळा कार्यवाहीबाबत दोन्ही पंचास, सापळा पथकास व मला आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यावेळी मी पोनि श्री कदम यांना म्हणालो की कर्मचारी कोंडलवार व श्री दिपक हे मध्यान्हनंतर कार्यालयात हजर असण्याची कमी शक्यता आहे तेव्हा ते दोघे कार्यालयात असल्यानंतरच सापळा कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केल्यावर पोनि श्री कदम यांनी श्री कोंडलवार व श्री दिपक हे तहसिल कार्यालयात हजर असतांना सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला तेव्हा मी गोपनीयरित्या माहिती घेतली असता श्री कोंडलवार व श्री दिपक हे कार्यालयात हजर नव्हते व कार्यालय बंद होते. त्यानंतर सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत श्री कोंडलवार यांचे कार्यालय बंद होते त्यावेळी माझे विनंतीवरून पोनि श्री कदम यांनी सापळा कार्यवाही ही दिनांक 12/01/2023 रोजी करण्याचा निर्णय घेतला व मला गोपनीयतेच्या सुचना देवून घरी जाण्याची परवानगी दिली.

त्यानंतर दिनांक 12/01/2023 रोजी पोनि श्री कदम व सर्व सापळा पथक असे भोकर येथे आले सदर दिवशी

कर्मचारी श्री कोंडलवार हे दिवसभर कार्यालयात हजर आले नसल्याची गोपनीय माहिती मिळाली त्यावेळी पोनि श्री कदम यांनी पुढील सापळा कार्यवाही ही दिनांक 13/01/2023 रोजी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर दिनांक 13/01/2023 रोजी पोनि श्री कदम व सर्व सापळा पथक असे भोकर येथे आले त्यावेळी बराच वेळ श्री कोंडलवार हे कार्यालयात हजर आले नसल्याने पोनि श्री कदम यांचे सुचनेवरून श्री दिपक यांना माझे फोनवरून त्यांचे फोनवर संपर्क केला व त्यांना आना बोला था ऑफीस को मिलने को असे म्हणालो असता श्री दिपक यांनी घर पे था साहब, आज छुट्टी दिखरी, साब ही नही आए असे म्हणाले तेव्हा मी त्यांना सोमवार को मिलता असे म्हणालो असता श्री दिपक यांनी ओके असे म्हणुन फोन कट केला. त्यावेळी पोनि श्री कदम यांनी सोमवारी 16/01/2023 रोजी पुढील सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

दिनांक 16/01/2023 रोजी पोनि श्री कदम हे सापळा पथकासह भोकर येथे आले. मी गोपनीय माहिती घेतली असता श्री कोंडलवार हे कार्यालयात आले नाही. त्यावेळी माझे विनंतीवरून पोनि श्री कदम यांनी दोन्ही पंचाशी चर्चा करून पुढील कार्यवाही ही दिनांक 17/01/2023 रोजी करण्याचा निर्णय घेतला.

दिनांक 17/01/2023 रोजी पोनि श्री कदम हे पंच व सापळा पथकासह 11.50 वाजताचे सुमार भोकर शहराच्या जवळील गुड्डा महादेव मंदिराजवळ आले मी त्यांची भेट घेवून त्यांना सांगितले की कर्मचारी कोंडलवार व श्री दिपक हे तहसिल कार्यालयात हजर आहेत. तेव्हा पोनि श्री कदम यांनी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी माझी अंगझडती घेण्यात आली व अँथ्रासिन पावडर लावलेली 12000/- रू रक्कम माझे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोनि श्री कदम यांनी मला योग्य त्या सुचना दिल्या व कर्मचारी श्री कोंडलवार किंवा दिपक यांनी लाच स्विकारल्यानंतर खिशातील रूमाल काढावी व हातात धरून सापळा पथकास लाचस्विकृतीचा ईशारा करावा असे कळविले त्यानंतर मी दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे तहसिल कार्यालयाच्या काही अंतर अलीकडे पोहचल्यावर सापळा पथकातील अंमलदार श्री ईश्वर जाधव यांनी 12.43 वाजता डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर माझे अडकविले तेथुन मी व पंच क्र-1 अब्दुल रफिक असे तहसिल कार्यालयामध्ये प्रवेश केला व सर्व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यावर कर्मचारी श्री कोंडलवार हे बसत असलेल्या कक्षामध्ये प्रवेश केला सदर ठिकाणी श्री कोंडलवार व श्री दिपक उपस्थित होते. श्री कोंडलवार यांनी मला पाहुन नमस्ते केले मी त्यांना क्या चलरा कोंडलवार साहब असे म्हणालो तेव्हा श्री कोंडलवार यांनी कुछ भी नही देखो असे म्हणुन सही मारो, नक्कल ले गये थे उस दिन असे म्हणुन माझी पावतीवर सही घेवून मला 60/- रू ची पावती दिली. तेव्हा मी त्यांना फोन लगाया था दिपक साहब को असे म्हणुन त्यांना आया था तुमको मिलने, सर वो लाया था असे म्हणुन पॅन्टच्या खिशामध्ये हात टाकला तेव्हा श्री कोंडलवार यांनी नही होना, मै तो जभीच बोला था नही होना असे म्हणाले तेव्हा मी त्यांना आप बोले थे असे म्हणालो, तेव्हा श्री कोंडलवार यांनी मला हम आपको जभीच बोले की नही लगते, तेव्हा मी त्यांना ठिक है सर अपना काम है, बाकी आप बोलनेसे बोला था आपको असे म्हणालो, तेव्हा श्री कोंडलवार यांनी तुम्हारा काम हो गया अच्छा हुआ बस बात खतम, उपर वाले को दुवा करणा असे म्हणाले, तेव्हा मी त्यांना आवु सर जी, धन्यवाद दिपक सर जी चलो असे म्हणुन लाचस्विकृतीचा ईशारा न करता पंच क्र-1 अब्दुल रफिक यांचेसोबत सदर कक्षा बाहेर आलो व तेथुन तहसिल कार्यालयाच्या बाहेर सुरक्षित ठिकाणी येवून थांबलो माझे पाठोपाठ सर्व सापळा पथक सदर ठिकाणी आले तेव्हा श्री ईश्वर जाधव यांनी माझेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केला त्यावेळी मी व पंच क्र-1 अब्दुल रफिक यांनी सर्व हकीकत पोनि श्री कदम यांना सांगितली. पोनि श्री कदम यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकले. सदर सापळा कार्यवाही दरम्यान कर्मचारी कोंडलवार व दिपक यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही.

एकंदरीत मी दिनांक 06/01/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दिनांक 11/01/2023 रोजी 12.06 ते 13.05 वाजताचे दरम्यान केलेल्या लाचमागणी पडताळणीच्यावेळी तहसिल कार्यालय भोकर येथील श्री सुभाष रघुनाथ कोंडलवार, वय 46 वर्षे, पद महसुल सहायक, रा वायफना ता. हदगांव यांनी मला गायरान पटट्याच्या आदेशाची प्रतीची नक्कल देवून फिसच्या नावाखाली बक्षिस म्हणुन 12,000/- रू लाचेची मागणी केली व त्यांचे कार्यालयात हजर असलेले श्री दिपक चंद्रकांत घुगरे, वय 51 वर्षे, खाजगी व्यक्ती, रा. सईद नगर भोकर यांनी श्री कोंडलवार यांचे लाच मागणीस होकार दर्शवुन माझेकडुन लाच घेण्यास सहमती दर्शवली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद आहे.

मी वरील फिर्याद वाचुन पाहिली ती माझे सांगणप्रमाणे संगणकावर टाईप करून त्याची प्रिंट काढली सदर फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

हीं फिर्याद दिली सही व नाव
( मो.सलीम अलीमोधीन )

रा.भोकर ता. भोकर जि.नांदेड.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VIKAS SHEKUJI PATIL(I (Inspector)) / POBN62686 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

**Name** (नाव): VIKAS SHEKUJI PATIL

**Rank**(पद): I (Inspector)

पोलिस ठाणे भोकर

**No.**(सं.): POBN62686